दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १०३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.१३ जुलै २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# उरण तालुक्यात जोरदार पावसामुळे नद्या नाल्यांना पूर

## घर अंगावर कोसळून आदिवासी बांधवाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात दोन दिवसांत झालेल्या जोरदार पावसामुळे नद्या व नाल्यांना पूर आला असून काही रहिवाशांच्या घरात पूराचे पाणी शिरले आहे. त्यातच काल रात्रीच्या सुमारास वाऱ्यांसह आलेल्या मुसळधार पावसामुळे चिर्ले ग्रामपंचायत हद्दीतील जांभुळपाडा आदिवासी वाडीवर आदिवासी बांधवांच्या अंगावर राहते घर कोसळून दुदैवी घटना घडली. घरातील मंडळी झोपेत असल्याने राम कातकरी या आदिवासी बांधवांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर त्याची पत्नी,मुले जखमी झाले आहेत.

मागील पाच दिवस उरण तालुक्यातील जनतेला सतत पडणाऱ्या पावसाने झोडपून काढले आहे. त्यामुळे भात शेतीची कामे खोळंबली आहेत. त्यातच सोमवारी व मंगळवारी पावसाने पुन्हा एकदा दमदार हजेरी लावल्याने तालुक्यातील नद्या व नाल्यांना पूर आला असून काही रहिवाशांच्या घरात पूराचे पाणी शिरले. तसेच गावोगावचे रस्ते जलमय झाले असल्याने रहिवाशी भिंतीच्या सावटाखाली राहत आहेत.





काल रात्रीच्या सुमारास वाऱ्यांसह आलेल्या पावसामुळे चिर्ले ग्रामपंचायत हद्दीतील जांभूळपाडा आदिवासी वाडीवर कौलारू घर अंगावर कोसळून दुदैवी घटना घडली.

सदर घटना ही रात्रीच्या सुमारास घडल्याने घरातील मंडळी ही झोपेत असल्याने राम कातकरी या आदिवासी इसमाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर घरातील महिला व मूले जखमी झाले आहेत.

या घटनेची माहिती मिळताच गावातील आशा वर्कर, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ, ग्रामपंचायत सरपंच, सदस्य, तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्गाने घटना स्थळी धाव घेऊन जखमींना रुग्णालयात दाखल केले. तसेच तहसील कार्यालया अंतर्गत पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत.

# शिवसेनेचा राष्ट्रपतीपदासाठी द्रौपदी मुर्मूंना पाठिंबा ; उद्धव ठाकरेंची घोषणा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राष्ट्रपतीपदासाठी एनडीएच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांना शिवसेनेनं पाठिंबा जाहीर केला आहे. याची घोषणा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी शिवसेना भवनात आयोजित पत्रकार परिषदेत केली. शिवसेनेनं कधीच कोत्या मनानं वागलेली नाही.

एका आदिवासी महिलेला राष्ट्रपतीपदाची संधी मिळत आहे तर आपण त्यांना पाठिंबा दिला पाहिजे अशी भावना खासदारांनी व्यक्त केली होती. त्याचा सन्मान करत शिवसेनेनं राष्ट्रपतीपदासाठी द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे, असं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

शिवसेनेच्या खासदारांनी द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा देण्यासाठी उद्धव ठाकरेंवर दबाव आणल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. यावरही उद्धव ठाकरे यांनी स्पष्टीकरण दिलं. माझ्यावर खासदारांनी कोणताही दबाव आण- लेला नाही. द्रौपदी मुर्मू या आदिवासी समाजाचं प्रतिनिधीत्व करतात. त्यामुळे आमच्या पक्षातील आदिवासी समाजाचं प्रतिनिधीत्व करणाऱ्या नेत्यांनी एका आदिवासी उमेदवाराला देशाचं



राष्ट्रपतीपद भूषवण्याची संधी मिळत असल्यामुळे आपण पाठिंबा द्यायला हवा अशी विनंती माझ्याकडे केली. शिवसेनेनं याआधीही पक्षीय अभिनिवेशन बाजून ठेवून प्रतिभाताई पाटील, प्रणब मुखर्जी यांना पाठिंबा दिला होता. त्यामुळे शिवसेना कधीच कोत्या मनानं वागलेली नाही, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

# आज ना उद्या ही सत्ता जनता बरखास्त केल्याशिवाय राहणार नाही : शरद पवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

सत्ता केंद्रीत करणारा प्रयत्न ताकद देण्याचा असू शकतो परंतु जनता बोलत नाही ती बघत असते, निरीक्षण करत असते. आज देशातील अनेक राज्य बरखास्त करण्याचा प्रयत्न होतोय. त्यामुळे आज ना उद्या ही सत्ता जनता बरखास्त केल्याशिवाय राहणार नाही, असे स्पष्ट मत राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन व्यक्त केले. तसेच, भाजपवर एकप्रकारे इशाराही दिला आहे. आज राष्ट्रवादी काँग्रेसची राज्य कार्यकारिणीची बैठक यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई येथे पार पडली. यावेळी शरद पवार यांनी कार्यकर्त्यांना विरोधातील अडीच वर्ष लोकांच्या अडीअडचणीला धावून जाण्याचे आवाहन केले.

संसदीय लोकशाहीवर हल्ला करण्याचे काम सध्या भाजप करत आहे. मध्यप्रदेश असेल आणि आता महाराष्ट्रात काय झालं तुम्हाला माहीत आहे. लोकशाही मार्गाने आलेल्या लोकांना बाजुला करुन सत्ता आपल्या हातात कशी राहील असा प्रयत्न होत आहे. हा सत्तेचा दोष आहे. सत्ता केंद्रीत झाली तर ती एका



हातात जाते ती सत्ता विकेंद्रित झाली पाहिजे तर ती अनेक लोकांच्या हातात जाते. मात्र, हल्ली केंद्रातील सरकार केंद्रीत करण्याचा प्रयत्न सुरू आहे. ईडी, सीबीआय या गोष्टी आपल्याला अगोदर कधी माहीत नव्हत्या त्या अलीकडे आल्या आहेत. ईडीचा .../२

# पेण उत्कर्षनगर येथे पुन्हा घरफोडी ; १ लाख ७६ हजाराचा ऐवज लंपास

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण शहरात पुन्हा एकदा चोरट्यांनी डोके वर काढले असून रात्रभर पडणाऱ्या पावसाचा फायदा घेत चोरटयांनी पेणमधील उत्कर्षनगर येथील भाग्यश्री रेसिडेन्सी मधील फ्लॅटचा लॉक तोडून सोन्या-चांदीचे दागिने मिळून जवळ जवळ १ लाख ७६ हजाराचा ऐवज लंपास केला आहे.

याबाबत माहिती अशी कि, मनिष रमेश म्हात्रे (वय २७) रा.भाग्यश्री रेसिडेन्सी, उत्कर्षनगर पेण हे रविवारी बाहेर गेले होते. त्याचा फायदा घेत यांच्या फ्लॅटचा दरवाजा चोरटयांनी हत्याराने कडी कोयंडा तोडून आतमध्ये प्रवेश केला. बेडरूममधील कपाटातील एकूण १ लाख ७६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे व चांदीचे दागिने व रोख रक्कम घरफोडी करून चोरून नेले. चोरटे सीसीटीव्ही मध्ये कैद झाले असून याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान चोरटयांनी इतरही फ्लॅटमध्येही घरफोडी करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला असून पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक समद बेग हे अधिक तपास करीत आहेत.

# बोर्ली स्टँड ते मांडला रस्त्याची दुरावस्था : सा.बां.खात्याचे दुर्लक्ष



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

साळाव-मुरुड रस्त्यावरील बोर्ली स्टँड ते मांडला या रस्त्यावर पावसाळ्यात पडलेले खड्डे अप-घाताला आमंत्रण ठरत असून याकडे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या असलेल्या दुर्लक्षाबाबत पंचक्रोशीतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

पावसाच्या सुरुवातीलाच मागील महिन्यात दुसऱ्या आठवड्यानंतर पडलेल्या पावसामुळे तसेच गेली चार पाच दिवस पडत असलेल्या दमदार पावसाने या रस्त्याची पार दुरावस्था झाली असून खड्यांचे प्रमाण वाढले असून रस्त्यावर सातत्याने वाहनांची वर्दळ असल्याने वेळप्रसंगी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. याठिकाणी खड्यांमुळे अनेक वाहन चालकांना अपघाताला सामोरे जावे लागले आहे. शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याने यात लक्ष पुरवून बोर्ली स्टँड ते मांडला रस्त्यावरील खड्डे बुजविण्याची मागणी पंचक्रोशीतून होत आहे.

## संक्षिप्त...

### मराठी नामफलकांबाबत पूर्ततेसाठी 30 सप्टेंबर 2022 पर्यंत मुदतवाढ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महानगरातील दुकाने व आस्थाप-ना यांच्या मराठी नामफलकाबाबत अधिनियमातील तरतुदीनुसार पूर्तता करण्यासाठी दिनाक ३० जून २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि, महानगरपालिका आयुक्त डॉ. इकबाल सिंह चहल यांच्या निर्दे शांनुसार अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) आशीष शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीमध्ये सहभागी झालेल्या विविध व्यापारी संघटनांनी नामफलक सुधारणा करण्यास मुदतवाढ मिळण्यासाठी विनंती केली होती. या अनुषंगाने नामफलक सुधारणा करण्यास ३ महिन्यांची मुदतवाढ देण्यास महानगरपालिका आयुक्त डॉ. इकबाल सिंह चहल यांनी नुकतीच मंजुरी दिली आहे. यानुसार आता नामफलक सुधारणा करण्यास दिनांक ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती दुकाने व आस्थापना खात्याच्या प्रमुख अधिकारी श्रीमती सुनिता जोशी यांनी दिली आहे.

याबाबत असेही नमूद करण्यात येत आहे की, महाराष्ट्र शासनाद्वारे 'महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, दिनांक १७ मार्च २०२२' अन्वये 'महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२२' प्रसिद्ध करण्यात आला आहे.

# उरण - पनवेल तालुक्यातील भूसंपादन कार्यालये स्थलांतरित करू नयेत

**दै.रायगड नगरी । उरण**

नवीमुंबई परिसरात उरण व पनवेल तालुक्यातील भूसंपादन कार्यालय(मेट्रो सेंटर) ही त्या त्या तालुक्यातुन हलवून अन्य ठिकाणी स्थलांतरित होत आहेत. ही कार्यालये तालुक्यातून न स्थलांतरित करू नये अशी मागणी अखिल भारतीय किसान सभेने केली असून तशा आशयाचे निवेदन किसान सभेचे रायगड जिल्हा अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे व सचिव संजय ठाकूर यांनी कोकण आयुक्त,जिल्हाधिकारी रायगड, उपविभागीय अधिकारी पनवेल, तहसिलदार पनवेल व तहसिलदार उरण यांना दिले आहे.

सिडकोने नवीमुंबई प्रकल्पासाठी ज्यांच्या जमिनी संपादित केलेल्या आहेत. त्यातील कित्येक प्रकल्पग्रस्तांना सिडकोने आजतागायत साडेबारा टक्केच्या भुखंडांची पात्रता दिलेली नाही. त्याच प्रमाणे ज्या शेतकऱ्यांची वाढीव मोबदला मिळण्यासाठी जिल्हा न्यायालयात दावे दाखल करण्यात आलेले आहेत, त्यांना वेळोवेळी त्यांच्या ऐवर्डच्या प्रतीची गरज भासते. या शिवाय नोकरी .../२

# नागोठण्यातील अंबा नदीने ओलांडली धोक्याची पातळी

## एस.टी. स्थानक, कोळीवाडा व मुख्य रस्त्यावर पुराचे पाणी

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

गेल्या दोन-तीन दिवसांपासून पडणाऱ्या मुसळधार पावसाने सुधागड तालुका व नागोठणे परिसराला झोडपून काढले. त्यामुळे येथील अंबा नदीने मंगळवारी (दि.१२) दुपारी एक वाजण्याच्या सुमारास धोक्याची पातळी ओलांडली. अंबा नदीचे हे पुराचे पाणी संध्याकाळी येथील ऐतिहासिक जुन्या पुलावरून गेल्याने वाहतूक बंद झाली. त्यामुळे नागोठण्याचा वरवठणे गावाशी संपर्क तुटला. तसेच येथील एस.टी. स्थानकासहीत लगतच असलेल्या टेम्पो स्टँड परिसरात, कोळीवाडा व नागोठणेहून पेणकडे जाण्यासाठी असलेल्या गावातील मुख्य रस्त्यावर लेकव्ह्यू हॉटेल समोर व व महाड बाजूकडे जाणाऱ्या रस्त्यावर मरीआईच्या मंदिरासमोर अशा दोन्ही बाजूकडील रस्त्यावर पूराचे पाणी आले होते. याशिवाय नागोठण्याजवळील कोलेटी, शेतपळस गावाच्या परिसरातही पुर परिस्थिती निर्माण झाली होती.

दरम्यान हवामान खात्याने जिल्ह्यात मुसळधार पावसाचा इशारा दिलेला आहे. तरी नागोठणे पोलीस .../२



# जिल्हा परिषद अन् पंचायत समित्यांच्या आरक्षण सोडत कार्यक्रमास स्थगिती

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील २५ जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या २८४ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी देण्यात आ-लेला आरक्षण सोडत कार्यक्रम सर्वोच्च न्यायालयात आज झालेल्या सुनावणीच्या पार्श्वभूमीवर स्थगित करण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने घेतला आहे.

राज्य निवडणूक आयोगाने ५ जुलै २०२२ रोजीच्या पत्रान्वये संबंधित जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांसाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम दिला होता; स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेसंदर्भात आज सुनावणी झाली.

एका आठवड्यानंतर पुढील सुनावणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर आरक्षण सोडतीचा कार्यक्रम स्थगित केला आहे. सुधारित आरक्षण सोडत कार्यक्रम यथावकाश देण्यात येईल, असे राज्य निवडणूक आयोगाच्या प्रसिद्धिपत्रकात नमूद केले आहे.

# आता माजी आमदार उतरणार मैदानात

## उद्धव ठाकरेंनी तयारीला लागण्याचे दिले आदेश

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिवसेनेच्या तब्बल ४० आमदारांनी एकनाथ शिंदे यांची साथ देत भाजपसोबत सत्ता स्थापन केली. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाची, तर देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या समर्थक आमदारांनी केलेल्या बंडाच्या पार्श्वभूमीवर आता शिवसेनेला पुन्हा नव्यानं उभारी देण्यासाठी शिवसेना पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे दररोज नेते आणि पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेत आहे.

उद्धव ठाकरे यांनी आज मातोश्रीवर शिवसेनेच्या सर्व माजी आमदारांसोबत संवाद साधला. यावेळी शिवसेनेचे जवळपास ३० ते ३५ आमदार उपस्थित होते. यावेळी तुम्ही तयारीला लागा, असे आदेश उद्धव ठाकरे यांनी दिले.





तसेच संघर्षाची तयारी ठेवा, सगळ्यांना पुन्हा लढायचं आहे. आपली वारंवार बैठक होणार आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले. तसेच आम्ही तुमचे आणि मतदारसंघातील मूळ प्रश्न सोडवणार, असा विश्वासही उद्धव ठाकरे यांनी माजी आमदारांना दिला.

तत्पूर्वी, राष्ट्रपतीपदासाठी एनडीएच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांना शिवसेनेनं पाठिंबा जाहीर केला आहे. याची घो-षणा उद्धव ठाकरे यांनी आज शिवसेना भवनात आयोजित पत्रकार परिषदेत केली. शिवसेनेनं कधीच कोत्या मनानं वागलेली नाही. शिवसेनेनं याआधीही पक्षीय अभिनिवेशन बाजून ठेवून प्रतिभाताई पाटील, प्रणब मुखर्जी यांना पाठिंबा दिला होता, असं उद्धव ठाकरेंनी सांगितलं.

एका आदिवासी महिलेला राष्ट्रपतीपदाची संधी मिळत आहे तर आपण त्यांना पाठिंबा दिला पाहिजे अशी भावना खासदारांनी व्यक्त केली होती. त्याचा सन्मान करत शिव-सेनेनं राष्ट्रपतीपदासाठी द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे, असं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले. माझ्यावर खासदारांनी कोणताही दबाव आणलेला नाही. द्रौपदी मुर्मू या आदिवासी समाजाचं प्रतिनिधीत्व करतात, असं उद्धव ठाकरेंनी यावेळी स्पष्ट केलं.

**भाड्याने देणे आहे**

जिल्हा सत्र न्यायालय समोरील, लोखंडीपाडा, पनवेल येथील हॉटेल भाड्याने देणे आहे.

संपर्क : ९८६७७०४४१६/ ९५९४०९३१११

# जागतिक सर्प दिनानिमित्त रायगड जिल्ह्यातील सर्पमित्रांचा होणार सन्मान

**दै.रायगड नगरी । उरण**

उलवे येथील वटवृक्ष सामाजिक संस्थेच्या वतीने १६ जूलै जागतिक सर्प दिनानिमित्त रायगड जिल्ह्यातील तमाम सर्पमित्रांच्या आत्तापर्यंत करीत आलेल्या जीगरबाज निसर्गसेवेबद्दल आदर्श सर्पमित्र रायगड हा सन्मानपत्र देवून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे.

जागतिक सर्पदिन हा जगभरातील विविध सापांच्या प्रजातींविषयी जागरुकता वाढविण्यासाठी साजरा करण्यात येतो. साप हा जैवविविधेतील परिसंस्थेतील एक मुख्य घटक आहे, त्या सापांना वाचविण्याचे कार्य हे सर्पमित्र करित असतात. त्यासाठी ते आपल्या जीवाची कसलीही पर्वा न करता नागरी वस्तीत आलेले विषारी- बीनविषारी सापांना पकडून निसर्गाच्या सानिध्यात सोडून देण्याचे कार्य करीत असतात.

आणि म्हणूनच वटवृक्ष सामाजिक संस्थेचे अध्यक्ष किरण मढवी यांनी त्यांचे सन्मान करण्यासाठी समस्त रायगड जिल्ह्यातील सर्पमित्रांना आपल्या नावाची दिलेल्या व्हाटस्अप क्रमांकावर ९८७०९५५५०५ नोंदणी करण्याबाबतची एक जाहिरात सोशल मिडीयाद्वारे प्रसिद्ध केली आहे.९८७०९५५५०५ या व्हाट्सअप नंबर वर नोंदणी केलेल्या सर्पमित्रांना त्यांच्या व्हॉटसअप क्रमांकावर आदर्श सर्पमित्र रायगड हे सन्मानपत्र पाठविण्यात येईल.

रायगड जिल्हातील सर्पमित्रांचा सन्मान हा वटवृक्ष सामाजिक संस्थेमार्फत होणारा जिल्हास्तरिय पहिला उपक्रम असल्याने जास्तीत जास्त सर्पमित्रांनी नोंदणी करुन आपल्या कार्याचा गौरव करण्याची संधी द्यावी असे नम्र आवाहन संस्थेचे अध्यक्ष किरण मढवी यांनी केले आहे.

# जनसेवेच्या माध्यमातून म्हसळयातील माजी विद्यार्थ्यांची प्राथमिक शाळेला शैक्षणिक साहित्य, खाऊ आणि वृक्ष भेट

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

सन १९८० आणि सन १९९० च्या दशकात रा.जि प.प्राथमिक मराठी शाळा आणि न्यू इंग्लिश स्कूल म्हसळा शाळेत अद्यापन केलेल्या शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी जनसेवेच्या संकल्पनेतुन एक हात मदतीचा ह्या उद्देशाने रायगड जिल्हा परिषदेच्या मराठी कन्या शाळा म्हसळा येथे शैक्षणिक साहित्य म्हणुन उत्तम दर्जाचे कपाट भेट देऊन सामाजिक उपक्रम पार पाडले.म्हसळा नाकोडा मेडिकलचे संचालक मराठी शाळेचे माजी विद्यार्थी दिलखुष जैन यांनी १० वर्षा आगोदर सोशल मीडियाचे माध्यमातून शालेय मित्र परिवाराचे वॉट्साप ग्रुप तयार करून नव्याने संकल्प जनसेवेचे संघटन केले आणि त्या अनुषंगाने माजी विद्यार्थी मित्र परिवाराचे आर्थिक सहकार्याने शाळेस शैक्षणिक साहित्य सुरक्षित ठेवण्यासाठी कपाट भेट दिले तसेच शाळेच्या विद्यार्थ्यांना खाऊ आणि प्रांगणात वृक्ष लागवडीसाठी माजी विद्यार्थी नितीन बोरकर, योगेश करडे, यांच्या मार्फत वृक्षांची रोप शाळा प्राचार्य शुभदा दातार यांच्याकडे सुपुर्द केली. शिक्षण प्रेमी जितेंद्र पाभरेकर यांचे अध्यक्षेतेत संपन्न झालेल्या कार्यक्रमाला प्राचार्य शुभदा दातार, माजी विद्यार्थी दिनेश नगराळे, रामदास महागावकर,नितीन बोरकर, योगेश करडे, मंगेश कदम, महेश रणदिवे, सुभाष जाधव, अशोक काते, प्रदिप कळस, बेबी उर्फ वृषाली कोबनाक,

शालेय शिक्षण कमिटी सदस्य संतोष सुर्वे, अजय करंबे, प्राचार्या शुभदा दातार, जितेंद्र पाभरेकर यांनी सांगितले.मराठी कन्या शाळेस माजी विद्यार्थी योगेश करडे यांच्या आजोबांनी जमीन दान करून योगदान दिले असल्याची आठवण त्यांनी उपसथितांना करून दिली.मराठी शाळेत चांगल्या दर्जाचे शिक्षण प्राप्त होते.आम्ही



शिक्षिका कल्पना पाटील, श्रीमती मेथा, वंदना खोत, इंदिरा चौधरी, समिधा वेदक आणि विद्यार्थी उपस्थित होते. अनेक वर्षांनी शाळेच्या कार्यक्रमात सहभागी होऊन थेट संवाद साधता आला आणि शाळेला भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा योग आल्याने सर्वच माजी विद्यर्थ्यांनी धन्यवाद व्यक्त केले.सर्वांचे ऋण व्यक्त करता येईल पण शाळा आणि गुरू यांचे ऋण कोणालाच फेडता येणे अशक्य असल्याचे कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि आमचे पाल्य मराठी शाळेत शिकुन यशस्वी झालो आहोत याचे आम्ही सारे वर्गमित्र मूर्तीमंत उदाहरण असल्याचे अशोक काते,रामदास महागावकर,मंगेश कदम,सुभाष जाधव यांनी मनोगातून सांगितले.

कार्यक्रमाचे नीटनेटके सूत्रसंचालन व स्वागत शिक्षिका कल्पना पाटील यांनी केले तर केलेल्या शैक्षणिक सहकार्याचे आभार प्राचार्या शुभदा दातार यांनी मनो-गातून व्यक्त केले.

# ड्रेनेज लाईन मध्ये पडलेल्या गायीला पोलिसांनी फायर ब्रिगेडच्या मदतीने काढले सुखरूप बाहेर

**दै.रायगड नगरी । पनवेल**



ड्रेनेज लाईन मध्ये पडलेल्या एका गायीला पनवेल शहर पोलिसांनी फायर ब्रिगेडच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने सुखरूप बाहेर काढले आहे. पोलिसांच्या या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

एकविरा हॉटेल ते तक्का दर्गा जाणाऱ्या रोड लगतच्या ड्रेनेज लाईन मध्ये गाय पडल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक दीपक शेळके यांच्यासोबत पोहवा पृथ्वीराज भोसले, पोहवा सतीश जवरे, पोना विष्णू गावडे, पोशी बाळासाहेब धनवट आदींच्या पथकाने घटनास्थळी जाऊन पाहणी केली.

लगेचच पोलिसांनी पनवेल फायर ब्रिगेड यांना पाचारण केले.

पनवेल शहर पोलिसांचे पथक आणि फायर ब्रिगेडच्या संयुक्त प्रयत्नांमुळे गाईला सुखरूप बाहेर काढण्यात आले. यावेळी जमलेल्या नागरिकांनी ड्रेनेजवरील झाकणे व्यवस्थित लावण्याची मागणी प्रशासनास केली तसेच गायीला सुखरूप काढल्याबद्दल पोलिसांचे आणि फायर ब्रिगेडच्या अधिकाऱ्यांचे कौतुक केले.

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे : शिवकर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जातील मिळकत / जमीन ही आमचे अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : शिवकर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गाव | भोगवटादाराचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| शिवकर | सुमन गंगाराम मते | २६/४ | ०-१८-२०<br>पोटखराबा ०-००-८०<br>एकूण क्षेत्र ०-१९-०० | ३.२५ |

सदरहू जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, क्षिस, लीज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ११/०७/२०२२

**सही/-**
**ॲड.महेश भगत**
**शॉप नं.२२, कल्पतरु कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.५१, सेक्टर नं.९, खांदा कॉलनी, नवीन पनवेल-पश्चिम, ता.पनवेल, जि.रायगड**

---

**अर्जदाराचे वकील**
**श्री.योगेश ना. म्हात्रे**

## जाहीर नोटीस

उरण येथील दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) यांच्या कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.११५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१२/०८/२०२२

श्रीमती.अपर्णा महादेव पाटील — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

ज्याअर्थी अर्जदार यांचे मयत पती कै.महादेव रामदास पाटील यांच्या नावे मे.जानकी बियर शॉप एफएलबिआर २ क्र.३८३ या क्रमांकाचा बिअर शॉप होता व आहे. त्यांनी तो बिअर शॅप स्वकष्टाने सुरू केलेला होता व आहे. अर्जदार यांचे पती महादेव रामदास पाटील हे दि.२७/०९/२०२१ रोजी त्यांच्या राहत्या घरी खोपटे येथे आजारपणात मयत झाल्याने त्यांचे वारस वारस म्हणून त्यांची पत्नी अर्जदार अपर्णा महदेव पाटील या कायदेशीर वारस असल्याने सदरहू बिअर शॉपची मिळकत ही मिळकत वारसा हक्काने त्यांच्याकडे आली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| शॉपचे नव | लायसन्स नं. |
|---|---|
| मे.जानकी बियर शॉप | एफएलबिआर २ क्र.३८३ |

कै.महादेव रामदास पाटील यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात हरकती सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही इसमाच्या हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.११/०७/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, उरण**

---

मा.इंदलकर सो. यांचे न्यायालयात

**अर्जदाराचे वकील**
**ॲड.रंजन सुर्यकांत पाटील**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी, वर्ग पहिला यांचे न्यायालयात
फौ.चा.अर्ज क्र.७९४/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२६/०८/२०२२

श्रीमती.गंगा विठ्ठल कोळी — अर्जदार
विरुद्ध
मा.निबंधक
जन्म-मृत्यू, विवाह नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत गव्हाण — सामनेवाले

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार श्रीमती.गंगा विठ्ठल उर्फ गंगाबाई विठ्ठल उर्फ गंगाबाई विठ्ठस कोळी यांचे सासरे मयत टिळक रामा कोळी ह्यांचा दि.०६/०६/१९८१ या दिवशी गाव गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी मृत्यू झालेला आहे आणि अर्जदार यांनी त्यांच्या सासऱ्यांच्या मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी, वर्ग पहिला यांचे न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू श्रीमती.गंगा विठ्ठल उर्फ गंगाबाई विठ्ठल उर्फ गंगाबाई विठ्ठस कोळी यांचे सासरे मयत टिळक रामा कोळी यांचा मृत्यू वर नमूद ठिकाणी झाला आहे किंवा कसे याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कोणाची हरकत असेल तर या जाहीर नोटीशीच्या दिनांकापासून १ (एक) महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या कायदेशीर हरकती नोंदविण्याच्या आहेत. या लेखावरुन असे कळविण्यात येत आहे की, सदरहू मुदतीत योग्य हरकती न आल्यास सदरहू न्यायालयात अर्जदार यांचेकडून योग्य तो पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीच्या मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

आज दि.११/०७/२०२२ या दिवशी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

# रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ च्या प्रांतपालपदी डॉ.अनिल परमार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रोटेरियन डॉ.अनिल परमार यांनी पनवेलच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ चे प्रांतपाल म्हणून सुत्रे स्विकारली. मावळते प्रांतपाल रोटेरियन पंकज शहा ह्यांनी डॉ अनिल ह्यांना प्रांतपालपदाची कॉलर घातली. ह्या प्रसंगी आंतरराष्ट्रीय रोटरी फाऊंडेशनचे प्रमुख ट्रस्टी डॉ भरत पंड्या, आंतरराष्ट्रीय रोटरीचे डायरेक्टर डॉ महेश कोटबागी, परेश ठाकूर, जे.एम.म्हात्रे, माजी प्रांतपाल रवी वडलामानी व रोटरी जगतातील बरेच सन्माननीय सदस्य व ६०० हून अधिक पुणे व पनवेल विभागातील रोटेरियन उपस्थित होते.

रो डॉ. अनिल परमार हे मागील २९ वर्षांपासून फिजिशियन म्हणून कार्यरत आहेत व पनवेल विभागातून रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ चे प्रातपाल होणारे ४ थे रोटेरियन आहेत. रोटरी वर्ष २२-२३ साठी डॉ परमार प्रांतपाल असणं ही पनवेलसाठी खरंच एक सन्मानाची बाब आहे. डॉ परमार हे मागील २८ वर्षांपासून रोटरी क्लब न्यू पनवेलचे सदस्य आहेत. या क्लबचे खांदा कॉलनी येथे मेडिकल सेंटर आहे जेथे ब्लड बँक, डायलिसिस सेंटर व डे केअर सेंटर आहे.

---

**प्रोसेस जमा ता.** **ॲड.प्रशांत भुजबळ**
**अर्जदारांचे वकील**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१०५५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१६/०८/२०२२

१) श्री.उदय अनंता पाटील
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती
रा.टेंभोडे, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीमती.सुगंधा बाळाराम पाटील
वय : ४३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.सांगडे, पो.अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.कल्याणी केशव मुंढे
वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.कोळखे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.अनुसया अनंता पाटील यांचे निधन दि.२७/०१/२०१९ रोजी झालेले आहे. तसेच कै.अनुसया अनंत पाटील यांचे पती कै.अनंत उर्फ अनंता धर्मा उर्फ धंबा पाटील यांचे निधन दि.१७/१२/२०१४ रोजी झालेले असल्याने श्री.उदय अनंता पाटील वगैरे ह्यांनी कै.अनुसया अनंता पाटील यांच्या सामाईक मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मौजे : टेंभोडे, ता.पनवेल, जि.रायगड**

| गाव/यु.केस नं. | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| टेंभोडे/६४ | ७५ | ५ ब | ०-२१-० | ३.८१ |

वरील संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै.अनंत उर्फ अनंता धर्मा उर्फ धंबा पाटील यांना सामाईकपणे मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे भूखंड नं.६० बी/१, सेक्टर नं.१०, क्षेत्र २०० चौ.मी. हा भूखंड वितरित करण्याचे इरादीत करण्यात आलेले आहेत.

श्री.उदय अनंता पाटील वगैरे हे कै.अनुसया अनंता पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्री.उदय अनंता पाटील वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.अनुसया अनंता पाटील यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१२/७/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

**मा.गुन्नाल सो**

**ॲड.रेखा होवाळे**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे समोर
चौ.अर्ज क्र.९२६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२६/०८/२०२२

१) शोभा मच्छिंद्र जगताप
वय : ४६ वर्षे, व्यवसाय : काही नाही
२) सुमित मच्छिंद्र जगताप
वय : २८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.आंबाले, पुणे, आंबाले पुरंदर — अर्जदार

ज्यापेक्षा मयत श्री.मच्छिंद्र प्रभु जगताप यांचा मृत्यू दि.१८/०९/२०२० रोजी सांगवी सांडस पुणे येथे निधन झाले आहे. अर्जदार नं.१ ही पत्नी आहे व अर्जदार नं.२ हा मुलगा आहे. आणि अर्जदार यांनी खालील मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

**SCHEDULE OF PROPERTY 'A'**

Name of the Property Holder :
Late Machindra Prabhu Jagtap
Flat No.503, in Wing "E", New Satara C.H.S. Ltd., at Kharghar, Plot No.A/24 E, Sector-12, Kharghar, Taluka-Panvel, District-Raigad.
Admeasuring area 271 Sq.Ft. (Built-up)
Agreement Value Rs.3,20,000/- (Rupees Three Lakhs Twenty Thousand Only)

यासाठी सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजविण्याचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात. आणि या लेखी नोटीसवरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट या अर्जदारास ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयत यांचा वारस घोषित करेल.

दि.१२ माहे जुलै सन २०२२ बेलिफाकडे

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

पृष्ठ क्र.१ वरुन...

## आज ना उद्या ही सत्ता जनता बरखास्त केल्याशिवाय राहणार नाही : शरद पवार

काँग्रेसकडून कधी वापर झाला नाही. मात्र, आता सत्तेचा वापर करून राजकीय दहशत निर्माण केली जात आहे. त्यामुळे सर्वांसाठी आज हा संघर्षाचा काळ आहे असेही शरद पवार म्हणाले. यावेळी आणीबाणीची आठवण शरद पवार यांनी सांगितली आणि त्यात १९७७ मध्ये इंदिरा गांधी यांनाही पराभवाला सामोरे जावे लागले होते असेही स्पष्ट केले. आज ज्या घडामोडी घडत आहेत त्यामध्ये शिवसैनिक कुठे हालला नाही. ज्यांनी सत्ता बदल करण्याचा प्रयत्न केला त्यांच्याविरोधात हा शिवसैनिक एकत्र झाला आहे. एखाददुसरा सोडला तर एकही निवडून येणार नाही हे मला शिवसैनिक सांगत आहेत. सत्तापरिवर्तन झाले ते लोकांना आवडलेले नाही. शिवसैनिक नाराज आहेत, त्यामुळे एक वेगळं चित्र राज्यात आगामी काळात पाहायला मिळेल असेही शरद पवार म्हणाले.

## उरण - पनवेल तालुक्यातील भूसंपादन कार्यालये स्थलांतरित करू नयेत

व विद्यावेतनाकरिता देण्यात येणारे दाखले हे भूसंपादन कार्यालयातूनच मागितले जातात.

त्यामुळे ही कार्यालये तालुक्यातच असणे आवश्यक बाब आहे.राज्य शासनाने दि.२५ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेले घरे नियमित करण्यासाठी जो शासन आदेश काढलेला आहे,त्यामध्ये जी कागदपत्रे सिडको प्रशासनाने मागितली आहेत.ती देखील मेट्रो सेंटर कार्यालयातूनच दिली जात आहेत.नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ बाधित प्रकल्पग्रस्तांचे योग्य पुनर्वसन झालेले नसून,त्यांचे प्रकल्पग्रस्त दाखले मिळणे आजही बाकी आहेत. या सर्व बाबींचा विचार करून ही कार्यालये स्थलांतरित करू नयेत.ही कार्यालये स्थलांतरित झाल्यास येथील स्थानिक प्रकल्पग्रस्तांना त्याचा आर्थिक,मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागणार असल्याने याचा गांभीर्याने विचार करून नवीमुंबई येथील सध्या सुरू असलेली भूसंपादन कार्यालये अन्य ठिकाणी स्थलांतरित करू नयेत अशी मागणी रायगड जिल्हा किसान सभेने केली आहे.

## नागोठण्यातील अंबा नदीने ओलांडली धोक्याची पातळी

ठाणे हद्दीतील आंबा नदी व खाडी किनारील गावचे ग्रामस्थांनी दक्षता बाळगून पाण्याची पातळी व परिस्थिती पाहून सुरक्षित ठिकाणी आपल्या कुटुंबासाहित स्थलांतरित व्हावे असे आवाहन यंत्रणेकडून करण्यात आले होते. अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडून नागोठण्यात पुराचे येण्यास सुरुवात झाल्याने येथील छ. शिवाजी महाराज चौक परिसरातील सर्व लहान-मोठे दुकानदार व बाजारपेठेतील दुकानदारांनी आपल्या सामानाची सुरक्षित स्थळी हलवाहलव करण्यास सुरुवात केली होती. तर नागोठणे पोलिस ठाण्याचे उपनिरिक्षक नारायण चव्हाण यांच्यासोबत पोलिस ठाण्याचे कर्मचारी तसेच नागोठणे ग्रामपंचायतीचे कर्मचारी पुर परिस्थितीवर लक्ष ठेवून होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## रायगडचे खेळाडू राष्ट्रीय पदक विजेते



**दै.रायगड नगरी । पनवेल**

दिनांक ०५/०७/२०२२ ते १०/०७/२०२२ या कालावधीत हैद्राबाद येथील नामांकित श्री.कोटला विजय भास्कर स्टेडियम या ठिकाणी राष्ट्रीय सब ज्युनिअर, ज्युनिअर, सिनिअर आणि मास्टर गटाच्या पावरलिफ्टिंग स्पर्धा संपन्न झाली.

या स्पर्धेत महाराष्ट्र संघातून रायगडचे २ पुरुष आणि १ महिला खेळाडू सहभागी झाले होते. या स्पर्धेत सदर खेळाडूंनी २ सुवर्ण आणि १ रौप्य पदक प्राप्त केले आहे. या पदक प्राप्त खेळाडूचे रायगड जिल्हा असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश वेदक, सेक्रेटरी अरुण पाटकर, सहसचिव सचिन भालेराव, तसेच शिवछत्रपती क्रीडा कार्यकर्ता पुरस्कार प्राप्त मारुती आडकर (खोपोली), संदीप कृष्णा पाटकर यांनी केले आहे.

तसेच शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त आणि आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू श्री.सतिश मुरलीधर पाताडे(मुंबई जिल्हा) यांनीसुध्दा या खेळाडूंचे कौतुक केले आहे. रायगडचे राष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू पुढीलप्रमाणे आहेत. १) कु.सलोनी पद्माकर मोरे (महाड) ज्युनिअर स्पर्धा – सुवर्ण पदक (६३किलो वजनी गटात) २) महेश कृष्णा पाटील (खोपोली – वावेशी) सुवर्ण पदक(मास्टर स्पर्धा ५९ किलो वजनी गट) ३) विनायक पाटील(खोपोली) रौप्य पदक (मास्टर गट ५९ किलो वजनी गट)


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# अतिवृष्टीचा हाहाकार, पाली, भेरव, आवंढे, उंबरवाडी व तुकसई गावात पुरपरिस्थिती

## पाच नदी पुलावरून पाणी ; शेकडो गावांचा संपर्क तुटला

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रायगड जिल्ह्यात मागील पाच दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. सर्वत्र अतिवृष्टी चा हाहाकार पहावयास मिळत असून पाण्याचा प्रवाह वाढल्याने मुख्य महामार्गासह अनेक गावांना जोडणाऱ्या नदी पुलांवरून पाणी जाऊ लागलेय. डोंगर दर्याखोऱ्यातुन व माळरान पठारावरून आलेला वेगवान पाण्याचा प्रवाह येथील नद्यांना मिळाल्याने सर्वत्र पुरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली. पाली खोपोली मार्गावरील पाली अंबा नदी पुलावरुन पाणी गेल्याने दोन्ही बाजुची वाहतूक तासनतास खोळंबली.



नवीन पुलाचे काम अपूर्ण असल्याने नागरिक , प्रवाशी विद्यार्थी यांना पुन्हा एकदा या त्रासाला सामोरे जावे लागले. सुधागड तालुक्यातील अनेक गावांना जोडणारा व रहदारी व वाहतुकीसाठी महत्वाचा असलेल्या भेरव पुलावरून देखील जोरदार पाणी वाहू लागले तसेच सर्वत्र पूरपरिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे सभोवतालच्या गावातील नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

खालापूर तालुक्यातील खोपोली – पाली रस्त्यापासून तुकसई गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील अंबा नदीवर असणाऱ्या छोट्या पुलावरून पाणी वाहत आहे, त्यामुळे हे दोन्ही पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. तुकसई व भेरव पुलालगत व सभोवताली अनेक गावे व आदीवासी वाड्या असल्याने येथील नागरिकांशी संपर्क तुटला असल्याचे समोर आलेय.

भेरव गावच्या जवळपास वाघोशी, कवेळे, आवंढे, महागाव, चंदरगाव, हातोंड, पडसरे, तसेच भोप्याची वाडी, चंदर गाव बौद्धवाडी, महागाव बौद्धवाडी, आसरे, उद्धर आदींसह गावे व आदिवासी वाड्याना जोडणाऱ्या भेरव पुलावर पाणी असल्याने या गावांचा संपर्क तुटल्याचे दिसून आले. तसेच विजबत्ती गुल झाल्याने अडचणीत अधिक वाढ झाली.

# संभे वाढीव नळपाणी पुरवठा योजनेसाठी आ.अनिकेत तटकरे यांच्याकडून प्रशासकीय मंजुरीचे पत्र



**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रोहे तालुक्यातील संभे गावातील नागरिकांच्या वाढीव नळपाणी पुरवठा योजनेसाठी आ.अनिकेत तटकरे यांच्याकडून ७७,४९,७०६ रू.एवढ्या निधीचे प्रशासकीय मान्यतेचे पत्र ग्रामस्थांना देण्यात आले आहे.

यावेळी माजी सरपंच संजय सानप, संदेश सानप, सुनील सानप, नारायण कडव, होनाजी सानप, विलास सानप, मंगेश सानप, नाना सानप आदींसह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. तर कोकणचे भाग्यविधाते तथा रायगडचे खा.सुनील तटकरे, आ.आदिती तटकरे व युवकांचे प्रेरणास्थान आ.अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून सदरचे प्रशासकीय मान्यतेचे पत्र खा.सुनील तटकरे यांच्या सुतारवाडी येथील गीताबाग नर्सरी निवासस्थानी संपन्न झालेल्या एका छोटेखानी कार्यक्रमात देण्यात आले आहे.

संभे या गावाचा दिवसेंदिवस होत असलेला विस्तार पाहता सद्यस्थितीत चालू असलेला पाणीपुरवठा कमी पडत असल्याची व त्यासाठी नवीन वाढीव नळ पाणी पुरवठ्याची मागणी ग्रामस्थांनी आ.अनिकेत तटकरे यांच्याकडे केली असता त्याची त्वरित दखल घेऊन व त्यासाठी ७७,४९,७०६ रुपये एवढा निधी मंजूर केला असून त्याचे प्रशासकीय मान्यतेचे पत्र आ.अनिकेत तटकरे यांच्या हस्ते ग्रामस्थांना देण्यात आले आहे. तसेच गरजेच्या वेळी खा.सुनील तटकरे व आ.आदिती तटकरे, आ.अनिकेत तटकरे यांनी मोलाचे सहकार्य केले असता संभे ग्रामस्थांनी त्यांना धन्यवाद दिले आहेत.

# इनरव्हील पनवेल सिटी तर्फे डॉक्टरांचा सत्कार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

इनरव्हील क्लब ऑफ पन–वेल सिटी यांच्यावतीने पनवेल पंचक्रोशीत विविध क्षेत्रात कार्यरत असणार्या, रुग्णांसाठी देवदूताची भूमिका बजावणार्या, वैशिष्ट्यपूर्ण आशा काही डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.



सत्कारमूर्ती डॉ प्रमोद गांधी (गांधी हॉस्पिटल), डॉ म्हात्रे (म्हात्रे हॉस्पिटल), डॉ धर्मेश मेहता (अनेस्थेसियोलॉजिस्ट), डॉ मृणाल बुवा (फिजिओथेरपिस्ट), डॉ जयश्री पाटील (लाईफलाईन हॉस्पिटल), डॉ समिक्षा नवरीकर (आयुर्वेदिक डॉक्टर), मा.डॉ शोभना पालेकर (पॅरामाउंट हॉस्पिटल), डॉ. वैभवी पालेकर (नेत्रतज्ज्ञ) डॉ भूपिंदर सिंग साहनी (होमिओपॅथी डॉक्टर), डॉ मंदार कुंटे (होमिओपॅथी डॉक्टर),डॉ मंजरी कुंटे (होमिओपॅथी डॉक्टर) डॉ. निलेश बांठिया(निओ क्लिनिक) डॉ. प्रदीप महेंद्रकर (पॅथॉलॉजिस्ट मेट्रो पोलिश) यांचा क्लबच्या अध्यक्षा हेतल जे बालड, सचिव गिरा चौहान, उपाध्यक्षा ध्वनी तन्ना, संपादक बिजल मिराणी, सहसचिव वैशाली ठक्कर, क्लबच्या पत्रव्यवहार ममता ठक्कर, पुर्वी मेहता, हॅपी मेहता, जयश्री मंगलानी शुभांगी दीक्षित, नेहल शहा, नैना बांठिया, विजेता कोठारी यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. अहोरात्र नि:स्वार्थपणे समाजासाठी कार्य करणार्या देवदूतासम डॉक्टरांचे क्लबचा वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

# वीर वाजेकर महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिन उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

फुंडे येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय महालन विभाग फुंडे येथे राष्ट्रीय सेवा योजना व अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या निमित्ताने सी.के. टी. कॉलेज, पनवेल येथील डॉ. बाळासाहेब पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी बोलताना त्यांनी जागतिक लोकसंख्या, आपल्या देशाची आर्थिक स्थिती, शैक्षणिक व्यवस्था यांचा परामर्श घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ.पी.जी. पवार हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.श्रीकांत गोतपागर यांनी केले यांनी केले.

डॉ.रत्नमाला जावळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. प्रा.सी.डी.धिंदळे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास उपप्राचार्य, डॉ.विलास महाले, प्रा.राम गोसवी तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.



# पुणे - कर्जत - पनवेल वाया भुसावळ गाडी पुन्हा सुरू

**दै.रायगड नगरी । कर्जत**

पुणे – कर्जत – पनवेल वाया भुसावळ ही गाडी बरेच महिने बंद होती. मात्र ती आता पुन्हा सुरू झाल्याने कर्जत, पनवेल च्या प्रवाशांची चांगली सोय झाली आहे. मार्च २०२० पासून ही गाडी बंद होती.

कोरोना संकटाच्या काळात अनेक गाड्या बंद केल्या होत्या त्यातील काही गाड्या अद्यापही बंदच आहेत. तर काही गाड्यांचे कर्जत चे थांबे रद्द केले आहेत. पुण्याहून सकाळी सहा वाजून दहा मिनिटांनी सुटणारी सिंहगड एक्सप्रेस नंतर एकदम साडे तीन वाजता कर्जतला थांबा असलेली गाडी होती. मधल्या सात – साडे सात तास कर्जत रेल्वे स्थानकावर थांबा असलेली गाडी नसल्याने प्रवाशांना कल्याण पर्यंत जाऊन परत यावे लागत आहे. त्यामुळे वेळेचा व पैशांचा अपव्यय होत आहे.

पुणे – भुसावळ गाडी सुरू झाल्याने प्रवाशांची चांगली सोय झाली असून पनवेलला जाण्यासाठीही ही गाडी उपयुक्त ठरत आहे. अजूनही प्रगती एक्सप्रेस आणि सह्याद्री एक्सप्रेस कधी सुरू होणार? याकडे प्रवाशांचे लक्ष आहे. तसेच ज्या गाड्यांचे थांबे कोरोना काळात बंद होते ते पुन्हा सुरू करावेत. कोंकणात जाणारी एकमेव गाडी पुणे – एर्नाकुलम या गाडीला कर्जतला थांबा द्यावा जेणे करून रायगड व ठाणे जिल्ह्यातील प्रवाशांना चांगली सोय होईल.

**वेळापत्रक**

गाडी नंबर ११०२६

पुण्या हुन सकाळी ११.४० वाजता सुटते. चिंचवड ११.५८, लोणावळा १२.४०, कर्जत १.२४ ,पनवेल २.१५, कल्याण ३.१५, इगतपुरी ५.१०, नाशिक रोड ५.५०, निफाड ६.१५, लासलगाव ६.२५, मनमाड ६.५०, चाळीसगाव ७.४०, पाचोरा ८.३०, जळगाव ९.१०, भुसावळ १०.००

गाडी नंबर ११०२५

परतीचा प्रवास भुसावळ रात्री १२.३५, जळगाव १.००, पाचोरा १.३०, चाळीसगाव २.१२, मनमाड ४.०५, लासलगाव ४.२४, निफाड ४.३९, नाशिक रोड ५.०५, इगतपुरी ६.१५, कल्याण ७.४२, पनवेल ८.५६, कर्जत ९.५२, लोणावळा १०.४४, चिंचवड ११.२९, पुणे १२.०५

# स्थानिक भुमीपुत्रांना नोकरीत समावून घेण्यात यावे

## तळे पत्रकार संघाचे आ.अदिती तटकरे यांना निवेदन



**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायत दिव्यांग निधी वाटप कार्यक्रमाचे आयोजन १२ जुलै २०२२ रोजी गणेश मंगल कार्यालयात करण्यात आले होते. यावेळी तळे मराठी पत्रकार संघ वतीने निवेदन सादर केले.

जिल्ह्यातील तळा येथे ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र तळा, मांदाड, महागांव, नियोजित रहाटाड, गिरणे उपकेंद्र होत असून विकासाकडे वाटचाल आहे. तसेच नव्याने ग्रामीण रुग्णालयाचे उद्घाटन तत्कालीन पालकमंत्री तथा आमदार अदिती तटकरे यांच्या हस्ते २८ जून २२ रोजी होऊन हॉस्पिटलची सुविधा उपलब्ध होत आहेत. तिथे आपल्या तालुक्यातील स्थानिक भुमीपुत्रांना प्रथम प्राधान्य मिळावे तालुका डोंगराळ दुर्गम असून सुशिक्षित बेरोजगारांना नोकरी धंद्याचे कोणतेच साधन नसल्याने त्यांच्या शिक्षणा प्रमाणे शासकीय कार्यालय दवाखाने, नगरपंचायत याठिकाणी वर्ग श्रेणी २ ते ४ वर्ग पर्यंत नोकरीत प्राधान्य द्यावे अशी मागणी तळे मराठी पत्रकार संघ यांनी आ.अदिती तटकरे यांना निवेदन दिले असून स्थानिक नागरिकांकडून देखील केली जात आहे.

तळा तालुका दुर्गम डोंगराळ भागात वसलेला असून ग्रामीण भागातील जनतेचा शेती हा एकमेव व्यवसाय आहे. तालुक्यात शैक्षणिकदृष्ट्या सूखसोयी असल्याने युवा /युवतीनी उच्च शिक्षण घेतले आहे. रोजगारा अभावी बेरोजगार झाले आहेत. हाताला काम नाही. व इतर रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्याने आर्थिक दृष्ट्या विकास झाला नाही. ग्रामीण भागातील बहुतेक नागरिक रोजी रोटीसाठी मोठ्या शहराकडे गैली असून फक्त नाना नानी घरात आहेत. प्राथमिक शाळेची पट संख्या देखील दिवसेंदिवस कमी होत चाललेली पहायला मिळत आहे. तालुका विकासासाठी तटकरे कुटुंबांनी ९२ साला पासून विकासाचे एक एक पाऊल टाकलेले दिसत आहे हे जनता कदापी विसरू शकत नाही. मात्र या विकासात स्थानिक भूमीपुत्रांना, सुशिक्षित बेरोजगार, सुशिक्षित बेरोजगार दिव्यांग व्यक्ती यांच्या भवितव्यासाठी अशा ठिकाणीविविध क्षेत्रातील पदावर प्राधान्याने सामावून घेतले जावे असे निवेदनातून मागणी केली. यावेळी दिव्यांग बांधवांना मार्गदर्शन करताना पत्रकार संघाने दिलेल्या निवेदनाप्रमाणे ग्रामीण रुग्णालयात स्थानिकांना श्रेणी नुसार शिक्षणा प्रमाणे निश्चितच सामावून घेतले जाईल असे आश्वासन दिले.

# सामूहिक पद्धतीने टोकण भात लागवड कोकणासाठी आदर्शवत : बालाजी ताटे

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

कोकणामध्ये वाढते स्थलांतर व भात शेतीमध्ये मजुरांची कमतरता असल्याकारणाने ओस पडलेली भातशेती सामूहिक पद्धतीने एकत्र येत टोकण यंत्राचा वापर करून गुरुमाऊली शेतकरी गट देवपूर यांनी केलेली भातशेती लागवड कोकणासाठी आदर्शवत आहे, असे मत महाड उपविभागीय कृषी अधिकारी बालाजी ताटे यांनी व्यक्त केले.

सदर प्रात्यक्षिक व क्षेत्रीय भेट कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती उपविभागीय कृषी अधिकारी बालाजी ताटे, प्रभारी तालुका कृषी अधिकारी नागनाथ घरत, पैठण मंडळ कृषी अधिकारी सुरज पाटील, कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे, कृषी सहाय्यक मनोज जाधव, गुरूमाउली शेतकरी गट अध्यक्ष जगदीश महाडिक, सचिव महादेव शिंदे, ज्ञानेश्वर पवार, चंद्रकांत शिंदे, बाबाराम चव्हाण, तुळशीराम पवार, चंद्रकांत पवार, विठोबा महाडिक व शेतकरी उपस्थित होते.



उपविभागीय कृषी अधिकारी बालाजी ताटे यांनी मार्गदर्शन करताना, उपस्थित शेतकऱ्यांना राष्ट्रीय कृषी विकास योजना अंतर्गत भात शेती अधिक उत्पादनासाठी एकात्मिक खत व्यवस्थापन, वेळेवर रोग किडीचे नियंत्रण करावे असे आवाहन केले. कमी खर्च ,कमी श्रम, अधिक उत्पादन ह्या करिता यंत्राच्या साह्याने केलेली भात टोकण पध्दत कोकणातील पडीक भात शेती लागवडीखाली आणण्यासाठी वरदान ठरेल, असे मत व्यक्त केले व टोकण भात लागवड तंत्रज्ञान इतर तालुक्यातील शेतकऱ्यांना अवगत व्हावे म्हणून प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात येईल, अशी ग्वाही दिली.

प्रभारी तालुका कृषी अधिकारी नागनाथ घरत यांनी युरिया ब्रिकेट वापर व फायदे या बाबतीत मार्गदर्शन केले व मंडळ कृषी अधिकारी सुरज पाटील यांनी पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

यावेळी कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे यांनी ठोंब पध्दतीने नाचणी लागवड प्रात्यक्षिक करून दाखविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व प्रास्ताविक कृषी सहाय्यक मनोज जाधव यांनी केले तर आभार जगदीश महाडिक यांनी केले.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## सूचना-१

साडेबावीस टक्के योजनेंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण "ना हरकत पत्र" मागणी अर्जानुसार सूचना **श्रीमती उषा रामचंद्र देशमुख व इतर ३ राहणार - मु. पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६**

**......(अर्जदार)**

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे **मे. अरामस वेंचुअर्स एल. एल. पी. तर्फे भागीदार श्री. सुधीर मानजीभाई भुषन व इतर ४** यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता "ना हरकत प्रमाणपत्रासाठी" मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशिल | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करार नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| १६८२ | ०७.०६.२०२२ | पुष्पक नोड | २६ | ३४१ | ३९९० | २३.०३.२०२२ | १३.०४.२०२२ |

या सूचनेद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरुपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरुपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर "ना हरकत प्रमाणपत्र" देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**(स्वाक्षरी)**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
सिडको/जनसंपर्क/१५३/२०२२-२३